कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
(लेखा व वित्त विभाग)

क्रमांक :–288 / प्रलेविअ / 2013 दिनांक : 15/10/2013

परिपत्रक

प्रति,
1) सर्व विभाग प्रमुख, महानगरपालिका, नागपूर
2) सहाय्यक आयुक्त ( सर्व झोन )
महानगरपालिका, नागपूर

विषय:– **महानगरपालिकेच्या नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना, सेवानिवृत्ती / कुटूंबनिवृत्ती वेतनधारकांना शासन निर्णयानुसार दिनांक 1 ऑक्टोंबर, 2013 पासून 10% दराने महागाई भत्ता वाढ लागू करण्याबाबत.**

संदर्भ :– 1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक–मभवा 1113 प्र.क्र.18 / सेवा–9, दि. 8 ऑक्टोंबर, 2013
2) महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक–मभवा 2013 / प्र.क्र.42 / सेवा–4, दि. 9 ऑक्टोंबर, 2013

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयानुसार राज्य शासनाने सुधारीत वेतन श्रेणीत वेतन घेणाऱ्या राज्य शासकीय व इतर पात्र त्यांच्या कर्मचाऱ्यांना, सेवानिवृत्ती / कुटूंबनिवृत्ती वेतनधारकांना दिनांक 1 जुलै, 2013 पासून ( दिनांक 1 ऑक्टोंबर, 2013 पासून प्रत्यक्ष वेतनात ) सुधारीत वेतन संरचनेतील मुळ वेतनावरील ( वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन ) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर 80% वरून 90% ( 10% दराने ) महागाई भत्ता वाढ मंजूर केलेली आहे. सोबत वर नमूद शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार महानगरपालिकेतील नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना, सेवानिवृत्ती / कुटूंबनिवृत्ती वेतनधारकांना **दिनांक 1 ऑक्टोंबर, 2013 पासून** 80% ऐवजी 90% ( 10% ) दराने महागाई भत्ता वाढ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

1) शासन निर्णयानुसार महानगरपालिकेतील नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना व सेवानिवृत्ती / कुटूंबनिवृत्ती वेतनधारकांना 80% ऐवजी 90% ( 10% ) दराने महागाई भत्ता वाढ **दिनांक 1 ऑक्टोंबर, 2013 ( ऑक्टोंबर, 2013 पेड इन नोव्हेंबर 2013 ) पासून प्रत्यक्ष वेतनात देयकात लागू करण्यात यावी.**

2) सदर्हू खर्च कर्मचाऱ्यांचे वेतन विभागाच्या ज्या व्यय पदामधून आहरण करण्यात येते त्या लेखा शिर्षाखली मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

सर्व विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, हे परिपत्रक कार्यवाहीकरीता सर्व संबंधितांच्या नजरेस आणावे.

**( मा. आयुक्त यांचे दिनांक 15/ 10 / 2013 चे आदेशान्वये )**

सहपत्र :– वरील प्रमाणे

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी :–
1) उपसंचालक ( लेखापरिक्षण ), म.न.पा. नागपूर
2) लेखा अधिकारी, म.न.पा. नागपूर
3) निगम लेखा परीक्षक, म.न.पा. नागपूर
4) सहाय्यक अधिक्षक, ( सेवानिवृत्ती वेतन ), म.न.पा. नागपूर यांना कार्यवाही करीता.
5) ऑडीट क्लार्क्स, वित्त विभाग, म.न.पा. नागपूर यांना योग्य कार्यवाही करीता
6) चेक रायटर वित्त विभाग, म.न.पा. नागपूर यांना कार्यवाही करीता
7) इन्चार्ज कॉम्प्युटर सेक्शन, महाल, नागपूर यांना योग्य कार्यवाही करीता

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी